प्रकरण तिसरे

# ना. म. मोरे यांचे चळवळीतील योगदान

## प्रकरण ३

# ना. ग. गोरे यांचे चळवळीतील योगदान

अ) संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९६०

ब) गोवा मुक्ती चळवळ १९६१

क) कामगार चळवळ

<u>प्रस्तावना</u> :

महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय घडणीवर ठसा उमटविणाऱ्यापैकी ना.ग.गोरे हे एक होते. ना.ग.गोरे हे केवळ विचारवंतच नव्हे तर खरे कर्मयोगी होते. ना.ग.गोरे यांनी स्वातंत्र्यसंग्रामात समर्पण भावनेने कार्य करून दीर्घकाळ कारावास सोसला तसेच त्यांनी आयुष्यभर समाजवादी विचारांचा आणि समतेचा पाठपुरावा केला.

ना.ग.गोरे यांचे जीवन संघर्षमय होते. सामाजिक समतेसाठी आणि अन्यायाविरूध्द ते लढले. भारतीय स्वातंत्र्याच्या विविध पर्वांत त्यांनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे गोमंतकाच्या मुक्तिसंग्रामात ते अग्रभागी होते. विलिनीकरणानंतर संस्थानी जनतेस प्रतिनिधिक संस्थात इतरांप्रमाणेच प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी झालेल्या लढ्यात आणि मागासवर्गीय, दलित, कामगार, कष्टकरी जनतेला सामाजिक न्याय मिळावा यासाठी झालेल्या आंदोलनात त्यांच्या बाजूने ना.ग.गोरे उभे राहिले.

प्रस्तुत प्रकरणात ना. ग. गोरे यांनी घेतलेल्या चळवळीतील सहभागाचा अभ्यास केला जाणार आहे. ना. ग. गोरे आणि त्यांचे सहकारी भारतीय स्वातंत्र्यासाठी लढले, त्याचप्रमाणे हैद्राबाद मुक्तिसाठी त्यांनी निजामाशी झुंज दिली. साडेचारशे वर्षे पोर्तुगीजांच्या गुलामगिरित जखडलेल्या गोमंतकासाठी त्यांनी आंदोलन छेडले.

प्रत्येक ठिकाणी अन्यायाविरूध्द त्यांनी संघर्ष केला.

ना.ग.गोरे हे त्यावेळेच्या तरूण कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान होते. तरूणांना ते सतत मार्गदर्शन करून त्यांचे मनोधैर्य वाढवत होते. सीमावासीयांच्या लढ्यामध्ये ते सतत अग्रभागी राहिले. ना.ग.गोरे यांनी अनेक चळवळीत भाग घेतला कारावास भोगला.

ना.ग.गोरे संयुक्त महाराष्ट्र चळवळ तसेच कामगार चळवळ यामध्ये सहभागी झाले. ट्रेड युनियनमध्ये त्यांनी महत्त्वाचे कार्य केले. कामगारांना त्यांचे हक्क मिळावेत म्हणून ते सतत प्रयत्नशील राहिले. समाज परिवर्तनासाठी त्यांनी आयुष्यभर परिश्रम केले. सयुंक्त महाराष्ट्र चळवळ, गोवामुक्ती संग्राम, कामगार चळवळीमध्ये त्यांनी मोलाचे कार्य केले. या तिन्ही लढ्यातील त्यांच्या कार्यांचा आढावा घेणे अपरिहार्य आहे.

**अ) संयुक्त महाराष्ट्र चळवळ -**

**भाषावार राज्य पुनर्रचना -**

भाषावार राज्ये बनविणे ही एक देश बांधण्याची कामगिरी आहे. या दृष्टीने विचार करूनच १९२० सालापासून या संकल्पाचा उच्चार झाला. १९२० साली जी कॉंग्रेसची घटना तयार करण्यात आली त्यात भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वास मान्यता देण्यात आली होती. पं. नेहरू व सप्रू यांच्या समितीने भारतीय घटनेचे जे चित्र कल्पिले त्यातही भाषिक राज्य निर्मितीचे तत्त्व गृहित धरलेले होते. अगदी थोडक्यात सांगायचे तर जोपर्यंत स्वराज्य मिळालेले नव्हते. तोपर्यंत या प्रश्नावर कॉंग्रेसमध्ये काही विवाद नव्हताच. स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी गांधीजीनी वेळोवेळी भषावार प्रांतरचनेचे समर्थनच केले होते. ब्रिटीशांशी लढताना कॉंग्रेस

कमिट्यांची उभारणी भाषिक तत्व स्वीकारूनच झाली होती याचे उदाहरण म्हणजे त्यावेळी मुंबई भागातील काँग्रेस कमिट्या भाषावार बनविण्यात आलेल्या होत्या. १

१९०५ साली काँग्रेसने बंगालच्या फाळणीस विरोध करून भाषावर प्रांतरचनेला पाठिंबा दिला. काँग्रेसने भाषावार प्रांताचे तत्त्व स्वीकारून १९२० साली प्रदेश काँग्रेस समित्यांची पुनर्रचना केली. १९२० मध्ये मोतीलाल नेहरू-सप्रू समितीने भाषावार प्रांतरचना असावी अशी शिफारस केली होती. त्यानुसार नागपूर काँग्रेसमध्ये पक्षाच्या घटनेत बदल करण्यात आला, आणि भाषेच्या तत्त्वावर प्रांतिक काँगेस कमिटी करण्याचे ठरले. अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसने भाषावार प्रांत पुर्नरचनेचे तत्त्व स्वीकारले होते. १९२७ साली 'इंडियन स्टॅट्यूटरी कमिशनला' भाषावार तत्त्वानुसार प्रांताची पुनर्रचना करावी अशी विनंती काँग्रेसने केलेली होती. ब्रिटिश शासनाने भारताच्या राज्यघटनेचा भावी आराखडा कसा असावा या संदर्भात नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली जी सर्वपक्षीय समिती नियक्त केलेली होती त्या समितीच्या नेहरू अहवालाने भाषेवर आधारित प्रांतांची पुर्नरचना करण्याची शिफारस केलेली होती. १९४५-४६ सालच्या काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात भाषावार प्रांतरचनेचा पुनरूच्चार केला होता.

## सयुंक्त महाराष्ट्र चळवळ -

संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९५५ साली सुरू झाली असली तरी तिची खरी सुरूवात १९३८ साली वऱ्हाढ प्रांतात झाली. १९३८ च्या नोव्हेंबर पासून ग.वि.पटवर्धन 'जोत्स्ना' हे वाङमयीन नियतकालिक चालवू लागले. कर्नाटक आणि आंध्र या प्रातांनी आपल्या एकीकरणाच्या चळवळी आधीच सुरू केलेल्या असताना महाराष्ट्रात मात्र एकीकरणाच्या दृष्टीने काहीच हालचाल होत नव्हती. याचे पटवर्धनांना

दु:ख वाटत होते. या दुर्लक्षित प्रश्नाच्या चर्चेला चालना देण्यासाठी 'जोत्स्ना' मासिकाने ४० पुढाऱ्यांना व लेखकांना एक प्रश्नपत्रिका पाठवली आणि त्यांच्या मुलाखती घेऊन सारांश छापला प्रथम महाविदर्भ निर्मितीची चळवळ हाती घ्यावी असे मध्यप्रांत- वऱ्हाडातील बहुतेक सर्व नेत्यांच्या मुलाखतींचे मुख्य लक्ष्य होते. डॉ. ना.भा. खरे यांना मध्यप्रांत-वऱ्हाडचे मुख्यमंत्रिपद सोडावे लागल्यानंतर हिंदी भाषिक नेत्यांच्या वर्चस्वाखाली मराठी भाषिकांना राहावे लागले. त्यामुळे डॉ. खरे, अनसूयाबाई काळे, रामराव देशमुख, नागपूर विद्यापीठाचे तेव्हाचे कुलगुरू तुकाराम जयराम केदार या मध्यप्रांत-वऱ्हाडातील नेत्यांना महाराष्ट्र एकीकरणाच्या चळवळीची पहिली पायरी म्हणून वऱ्हाड-नागपूरच्या आठ जिल्ह्यांचा महाविदर्भ हा स्वतंत्र उपप्रांत बनविण्याचो चळवळ ताबडतोब हाती घ्यावी असे वाटत होते. १९३८ मध्ये सी.पी.बेरार प्रातांच्या विधिमंडळाचे प्रतिनिधी श्री. रामराव देशमुख यांनी असा ठराव मांडला की, सी.पी.वऱ्हाडच्या जोडप्रांतातून वऱ्हाडला वेगळे करून त्याचा एक वेगळा प्रांत करावा. त्यानंतर दोन आठवड्यांनी मुंबई येथे महाराष्ट्र संमेलन भरले होते. त्यामध्ये वऱ्हाडसह महाराष्ट्राचा एकभाषी प्रांत बनवावा आणि निजामाचे संस्थान खालसा झाल्यानंतर त्यातील मराठवाडा आणि पोर्तुगीजांची सत्ता संपुष्टांत आल्यानंतर गोवा हे दोन्ही प्रदेश या एकभाषी प्रांतात सामील करावेत अशी मागणी करण्यात आली. १९३९ साली नगर येथे भरलेल्या साहित्य संमेलनात सर्व मराठी भाषा प्रदेशांचा मिळून एक प्रांत बनवावा आणि त्याला 'संयुक्त महाराष्ट्र' असे नाव द्यावे असा ठराव संमत करण्यात आला.

**संयुक्त महाराष्ट्र सभा -**

१९४० साली श्री रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे 'संयुक्त

महाराष्ट्र सभा' ही संघटना स्थापन झाली. महाविदर्भ, मराठवाडा, देश, कोकण व मुंबई शहर या महाराष्ट्राच्या पाच भागांतील लोकांचे स्नेहसंबंध वाढविण्याच्या उद्देशाने संयुक्त महाराष्ट्र सभा स्थापन केली गेली.

**महाराष्ट्र एकीकरण परिषद -**

१९४१ साली डॉ. केदार यांच्या नेतृत्वाखाली 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' भरविण्यात आली होती. कुलगुरू केदार यांना मराठी भाषिकांचा एकच प्रांत असावा असे वाटत होते. महाराष्ट्रात जो जन्मला व ज्याचे महाराष्ट्रात कायमचे वास्तव्य आहे त्याला महाराष्ट्रीय म्हणण्यात यावे असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी महाराष्ट्र एकीकरणाच्या चळवळीस प्राधान्य दिले.

१९४२ साली श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांनी महात्मा गांधींशी जो पत्रव्यवहार केलेला होता. त्यामध्ये गांधीजींनी संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेला पाठिंबा दिला होता. परंतु मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करण्यास मात्र त्यांचा विरोध होता. १९४३ साली मुंबई येथे भरलेल्या मराठी पत्रकार परिषदेत ज.स.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी व संयुक्त महाराष्ट्र सभेची संपूर्ण महाराष्ट्र निर्मितीची मागणी असे दोन ठराव मंजूर करण्यात आले. याच वर्षी अमरावती येथे डॉ. मुंकुंद जयकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महाविदर्भ परिषदेत महाविर्दभ राज्याच्या मागणीचा पुनरूच्चार करण्यात आला. त्याबरोबरच महाराष्ट्र एकीकरणास सहकार्य करण्याचा ठराव मान्य करण्यात आला. हा महाविदर्भाच्या मागणीचा ठराव महाराष्ट्र एकीकरणास पूरक होता. कारण या ठरावात असे म्हटले होते की, 'अमरावती, अकोला, नागपूर, भंडारा व चांदा यांच्या सरहद्दीवरील मराठी भाषिक भाग तसेच छिंदवाडा, बैतुल, खांडवा, बालाघाट या

हिंदी भाषिक भागातील मराठी भाषिक भाग त्या त्या जिल्ह्यातून वेगळा करून तो सलग मराठी भाषिक प्रदेशात घालावा.' २

## संयुक्त महाराष्ट्र परिषद -

स्वातंत्र्य म्िळण्यापूर्वी १९४६ साली बेळगांवच्या मराठी साहित्य संमेलनात 'संयुक्त महाराष्ट्र' या मराठी भाषिक प्रांताची मागणी करण्यात आली व याबाबतीत पुढील गोष्टी ठरविण्यासाठी तेथेच एक लहानशी समिती नेमण्यात आली. पण साहित्य संमेलन किंवा मराठी साहित्य परिष्द हे काही राजकीय समस्या सोडविण्याचे व्यासपीठ नव्हे. म्हणून २८ जुलै १९४६ या दिवशी श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'संयक्त महाराष्ट्र परिषद' ही सर्वपक्षीय आणि अपक्षीय यांची संघटना जन्मास आली. या परिषदेच्या शिष्टमंडळाने दार कमिशनपुढे आपले निवेदन दिले.

## दार कमिशन -

दार कमिशनचा अहवाल १९४८ च्या डिसेंबरमध्ये प्रसिध्द झाला तो प्रतिगामी स्वरूपाचा होता. या अहवालात, ''भाषिक प्रांताची मागणी संकुचित, प्रादेशिकतावादी असून तिच्यामुळे लोकवस्तीचे मोठया प्रमाणात स्थलांतर घडेल व रक्तपात नि अत्याचार माजतील'' इतके पराकाष्ठेचे विधान होते.

## जे. व्ही. पी. समिती

दार कमिशनचा अहवाल प्रसिध्द झाला त्याच महिन्यात जयपूर येथे काँग्रेस अधिवेशन भरले होते.काँग्रेसने २० सालापासून पुरस्कारिलेल्या तत्त्वाला हरताळ फासणारा दार कमिशनचा अहवाल फेकून देऊन या प्रश्नाचा फेरविचार करण्यासाठी जयरामदास दौलतराम, वल्लभभाई व त्या अधिवेशनाचे अध्यक्ष पट्टाभी सीतारामय्या

यांची त्रिसदस्य 'जे. व्ही. पी' समिती नेमण्यात आली. या समितीने दार यांच्यापेक्षा थोडी सौम्य पण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस अन्याय करणारीच शिफारस केली 'भाषावार राज्ये तूर्त बनवूच नयेत पण ती बनवावयाची असल्यास मुंबई शहर वगळून संयुक्त महाराष्ट्र द्यावा, अशी जे. व्ही. पी. समितीची शिफारस होती. म्हणजे स्वातंत्र्य पूर्वकाळात दिलेली आश्वासाने पूर्ण करण्याची टाळाटाळ त्यावेळी झाली होती.

'जे. व्ही.पी.' समितीची शिफारस १९४९ च्या एप्रिल मध्ये झाली, तेव्हा ना. ग. गोरे हेच प्रामुख्याने संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यात लक्ष घालीत. परिषदेच्या कार्यकारिणीचे सुरूवातीपासून ते सदस्य होते. एक नामवंत साहित्यिक व एक कुशल राजकारणी या दोन्ही नात्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नात ते जबाबदारीने लक्ष घालू शकत होते. त्या काळात 'मौज साप्ताहिकातून' महाराष्ट्राच्या प्रश्नाची चर्चा चालू होती. ना. ग. गोरे यांनी ''मौज'' मध्ये महाराष्ट्र मागे का पडला? या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर लेख लिहिला होता. भारतीय राजकारणात महाराष्ट्र मागे का पडत आहे. याचा खुलासा समाजातील सर्व थरांतील लोकांना ज्यांचे नेतृत्व मान्य आहे. असा पुढारी निर्माण होऊ शकला नाही, याच कबुलीने होऊ शकतो. महाराष्ट्रातील प्रश्न गुंतागुंतीचा आणि बिकट झाला होता तो म्हणजे, या प्रांतातील सामाजिक चळवळी ब्रिटीशांच्या काळात झाल्या कारणाने, ब्रिटीशांनी या चळवळींना ऐक्य प्रवर्तक विधायक वळण लागू दिले नाही. तसेच समन्वयवादी सहकारी वृत्तीही रूजू दिली नाही. परस्परांविरूध्द द्वेष निर्माण करून फुटीरपणाची तुटक वृत्तीच जोपसली. त्यामुळे समाज लवकर एकत्र येऊ शकला नाही.

संयुक्त महाराष्ट्र निर्माण न होण्यामध्ये काही गोष्टी कारणीभूत ठरल्या. संयुक्त

महाराष्ट्राचा प्रश्न हा देशात समाजवादी क्रांती घडवून आणून समाजवाद प्रस्थापित करण्याच्या मुख्य प्रश्नाचे एक अंग होता या गोष्टीकडे पुरेसे लक्ष पुरविले गेले नाही इतर प्रांतातील जनतेचे प्रश्न काय आहेत ते समजून घेऊन त्यांचा पाठिंबा आपल्या मागणीला मिळविला पाहिजे, सर्वांची एक आघाडी उघडली तरच हा प्रश्न हवा तसा सोडविता येईल ही गोष्ट त्यावेळी समजावून दिली गेली नाही. संयुक्त महाराष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी, प्राप्त परिस्थितीत कोणत्या साधनांचा अवलंब केल पाहिजे. या बद्दलही बहुजन समाजवादी मंडळींनी खोलवर विचार करून निर्णय घेतला नाही. समाजवादी पक्षाला काँग्रेसच्या हातून समाजवाद प्रस्थापित होईल असे वाटत नव्हते. त्यामुळे या काँग्रेस नेत्यांबरोबर त्यांचे एकमत होऊ शकत नव्हते. या प्रश्नावर काँग्रेस श्रेष्ठींना विरोध करण्याचे महाराष्ट्रातील काँग्रेसजनांनी ठरविले असते, तर ही एकजुट होणे सहज शक्य झाले असते. संयुक्त महाराष्ट्राच्या आड येणारी ही कारणे होती. १९५३ साली २ ऑक्टोबर रोजी आंध्र हा पहिला भाषिक प्रांत निर्माण झाला तेव्हा ना. ग. गोरे संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकारिणीवर होते. त्यावेळी पुण्यात गोवा विमोचन सहाय्यक समिती स्थापन झाली ना. ग. गोरे या समितीचे कार्यवाह होते. म्हणजे एका बाजूला संयुक्त महाराष्ट्र परिषद आणि दुसऱ्या बाजूला गोवा विमोचन सहाय्यक समिती या दोन कार्यक्षेत्रात ना. ग. गोरेंनी विशेष लक्ष घातले. ३

## राज्यपुनर्रचना आयोग :

भारत सरकारने २२ डिसेंबर १९५३ रोजी न्या. फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना केली. भाषावार प्रांतरचना करण्याच्या उद्देशाने या उच्चाधिकार समितीची निर्मिती करण्यात आलेली होती.

राज्यपुनर्रचना आयोगाने स्वत:च्या कार्यपध्दतीनुसार देशातील विविध प्रदेशांना भेटी देऊन लोकमत जाणून घेतले. मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी गुजरात प्रदेश काँग्रेस कमिटी, संयुक्त महाराष्ट्र परिषद इ. समित्यांनी भाषावार प्रांतरचनेसंबंधी आपली मते राज्य पुनर्रचना आयोगापुढे मांडली होती. ना. ग. गोरे यांनीही भाषावार प्रांतरचनेसंबंधी आपले मत राज्य पुनर्रचना आयोगाच्या पुढे मांडले. गोवा आंदोलनाची तीव्रता एकीकडे कमी होत असतानाच राज्यपुनर्रचना समितीच्या अहवालाचे वेध सर्वच राजकोय पक्षांना आणि त्यांच्या नेत्यांना लागले होते. राज्य पुनर्रचना आयोगाने सर्व भारतात एकभाषी राज्याची शिफारस केली होती, परंतु महाराष्ट्राला मात्र वेगळा न्याय दिला होता. त्यामुळे महाराष्ट्रात संताप उसळला गेला आणि या शिफारशींना तीव्र विरोध केला. ४

ना. ग. गोरे त्यावेळी पोर्तुगीजांच्या तुरूंगात होते. एस. एम. जोशी संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेतृत्व उत्साहाने करीत असल्याचे वृत्त ना. ग. गोरेंना कळले. २८ फेब्रुवारी १९५६ रोजी ना. ग. गोरेंनी गोव्यातील आग्वाद किल्ल्यातील तुरूंगातून एस. एम. ना पत्र पाठवले. एस. एम. जोशी हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीशी एकरूप होऊन काम करत होते. तसेच त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत हिरीरीने भाग घेतल्याचे ना. ग. गोरेंनी पत्रात नमूद केले होते. एस. एम. जोशींनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत एवढया हिरीरीने का उडी घेतली याची कारणे त्यांनी ७ एप्रिल १९५६ रोजी ना. ग. गोरेंना पाठवलेल्या पत्रात नमूद केली होती. ''खरोखर आम्हा महाराष्ट्रीयांना सर्वांनीच तोंडघशी पाडून निराश केले आहे असे मला वाटते. महाराष्ट्रातील बहुतेक जेष्ठ मंडळींनी आमची बाजू न घेता आम्हांला वाऱ्यावर सोडले. सेनापतीशिवाय सैन्याची जशी अवस्था होते तशी आज आमची अवस्था झाली आहे. आम्ही अंधारात चाचपडत आहोत. कोठून तरी आशेचा किरण

दिसेल या आशेने प्रार्थना करीत आहोत अशा वेळी तुम्ही आमच्यामध्ये असणे आवश्यक होते. माझ्यासारख्या मदतनिसांना बरोबर घेऊन इच्छित कार्य करण्यास तुम्ही अत्यंत योग्य व्यक्ती आहात. तरीही कधी कधी मला वाटते एका संकुचित अर्थाने एस. एम. जोशी म्हणजे संयुक्त महाराष्ट्र जोशी म्हणून ओळखला जाऊ लागला हे बरेच झाले. गुजराती भाषक मित्रांपासून मी दुरावलो आहे. मी अत्याग्रही प्रांतवादी बनलो आहे. असे इतरांना वाटते पण जेव्हा सर्वांनीच महाराष्ट्रीयांना तोंडघशी पाडून निराश केले तेव्हा महाराष्ट्रीयांबद्दलचे माझे कर्तव्य पार पाडणे मी कसे टाळू शकणार ? प्रांतवादी असण्याचा तुम्हांला कलंक लागू नये आणि योग्य वेळ येताच तुम्हाला अखिल भारतीय स्तरावर नेता म्हणून भूमिका करता यावी यासाठी सध्या तुम्हाला महाराष्ट्रापासून दूर ठेवण्याची व्यवस्था विधात्यानेच केली असावी असे वाटते. तुमचे नाव मतदारांच्या यादीत असेलच मला तुमचा सल्ला हवा आहे. समितीचे उमेदवार म्हणून तुम्हांला आगामी निवडणुकीत उभे करण्याचा आमचा विचार आहे. तुम्हाला संसदेची निवडणूक लढवणे आवडेल की विधानसभेची हे मला माहीत नाही. याबाबतची तुमची पसंती सूचित करावी.'' ५

## संयुक्त महाराष्ट्र समिती

६ फेब्रुवारी १९५६ रोजी पुण्यात टिळक स्मारक मंदिरात केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली एस. एम. जोशी यांनी निमंत्रण दिलेल्या महाराष्ट्रातील मुख्यत: विरोधी पक्षांच्या नेत्यांची व निवडक कार्यकर्त्यांची सभा भरली. यामध्ये लढयाचे मार्गदर्शन व नियंत्रण करण्यासाठी कृती समिती स्थापन करण्यात आली. कृती समितीला स्वंयसेवकांची नोंदणी करण्याचा सभासद स्वीकृत करण्याचा आपले कामकाज चालवण्याची पध्दत ठरविण्याचा आणि ध्येयसिध्दीसाठी इतर सर्व

गोष्टी करण्याचा अधिकार असल्याचे जाहीर करण्यात आले. ६ फेब्रुवारीस भरलेल्या सभेत एस. एम. जोशी म्हणाले "मुंबईसह बेळगाव कारवार असलेला संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्यासाठी लढा केला पाहिजे व तो लढा मी करणारच जनतेला ज्यात भाग घेता येईल असाच लढयाचा कार्यक्रम आखला जाईल." आरंभी सात आठ दिवस संयुक्त महाराष्ट्र परिषदेची कृतीसमिती म्हणून ओळखली जाणारी ही नवी संघटना कृती करू लागल्यावर संयुक्त महाराष्ट्र समिती म्हणून ओळखली जाऊ लागली.६

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सदस्यांची व निमंत्रितांची बैठक २४ फेब्रुवारी १९५६ रोजी मुंबईत प्रजासमाजवादी पक्षाच्या कार्यालयात भरली. राज्यपुनर्रचना विधेयक मुंबई विधानमंडळात मांडले जाईल तेव्हा सुरू करावयाच्या कार्यक्रमासंबंधीचा निर्णय घेणे आणि बेळगावच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी समितीचे प्रतिनिधी पाठवण्यासंबंधी विचार करणे असे दोन विषय समितीच्या विषयसूचित नमूद केले होते. मुंबई शहराप्रमाणेच बेळगाव, कारवार व निपाणी या शहरातील मराठी भाषकांच्या मनात केंद्र सरकार विरूद्धची संतापाची भावना धुमसत होती. ती व्यक्त करण्यासाठी १६ फेब्रुवारीस हया चार शहरात समितीतर्फे महाराष्ट्रदिन पाळण्यात आला. घरांवर काळी निशाणे लावावीत व मनगटावर काळ्या फिती लावाव्यात असे समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले होते. समितीच्या सत्याग्रह आंदोलनाची सुरूवात ९ मार्च रोजी बेळगावात करण्याचे ठरविले होते. बेळगाव नगरपालिकेने आपल्या इमारतीवर काळा झेंडा कायम फडकवत ठेवणार असल्याचे जाहीर केले होते. मुंबई महापालिकेची दर चार वर्षानंतर येणारी निवडणूक १९५६ च्या मार्चमध्ये घेण्याची वेळ जवळ झाली होती. ती टाळण्यासाठी निवडणूकच स्थगित करण्यासंबंधीचे विधेयक स्थानिक स्वराज्य संस्थाविषयीच्या खात्याचे मंत्री यशवंतराव चव्हाण यांनी

मुंबई विधानसभेत मांडले आणि बहुमताच्या जोरावर ते पास करून घेण्यात काँग्रेस पक्षाला कसलाही अडथळा आला नाही. उदयाचा पराभव परवा पत्करण्याचा हा प्रकार होता.

या पार्श्वभूमीवर संयुक्त महाराष्ट्र समितीने आखलेला असहकाराचा कार्यक्रम लक्षात घ्यात्रयास हवा. संसद, राज्यविधानमंडळ, महापालिका, नगरपरिषदा यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी सदस्यत्वाचे राजीनामे दयावेत तसेच सरकारने नेमलेल्या सल्लागार समित्यांच्या सदस्यानीही राजीनामे दयावेत असा समितीने आदेश दिला. सर्व सरकारी समारंभावर बहिष्कार टाकावा असेही ठरले राज्य पुनर्रचना विधेयकावर जेव्हा मुंबई विधानमंडळात चर्चा होईल तेव्हा विधानमंडळासमोर तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या आणि तालुक्याच्या ठिकाणच्या मामलेदारांच्या कार्यालयासमोर निदर्शने करावीत असे ठरले. शांततापूर्ण सत्याग्रहात एका वेळी, एका ठिकाणी १२ जणांच्या तुकडीने भाग घ्यावा मात्र कोठेही एका दिवसांत तीन तुकडयातील एकुण ३६ जणांपेक्षा जास्त व्यक्तींनी सत्याग्रह करू नये अशी मर्यादा घालण्यात आली. स्थानबध्द केलेल्यांच्या मुक्ततेची आणि नोव्हेंबर १९५५ व जानेवारी १९५६ मध्ये सरकारने केलेल्या गोळीबाराची चौकशी करण्याची मागणी ठिकठिकाणी सभा घेऊन करावी असे सांगण्यात आले. ७

६ फेब्रुवारी १९५६ रोजी पुणे येथील टिळक स्मारक मंदिरात केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी समान व्यासपीठाची आवश्यकता वाटू लागली. काँग्रेस पक्षाशिवाय अन्य सर्व विरोधी राजकीय पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीला मार्गदर्शन

करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली. पूर्वीची संयुक्त महाराष्ट्र परिषद अस्तित्वहीन आणि निष्क्रीय झाल्यामुळे नव्याने संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली. अर्थात पूर्वीच्या परिषदेची उद्दिष्टे संयुक्त महाराष्ट्र समितीने स्वीकारली होती. संयुक्त महाराष्ट्राचे मराठी भाषिकाचे एकात्म व सलग राज्य निर्माण करण्याचे प्रधान उद्दिष्ट संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्थापनेमागे होते. १९५६ रोजी पूर्वीची संयुक्त महाराष्ट्र परिषद विसर्जित करण्यात आली. मुंबई, विदर्भ, मराठवाडा, बेळगाव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झालाच पाहिजे, या निर्धाराने संयुक्त महाराष्ट्र समितीने आपल्या कार्याला सुरूवात केली होती. संयुक्त महाराष्ट्र समितीत प्रजासमाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, भारतीय जनसंघ, हिंदुमहासभा इ. विरोधी राजकीय पक्ष सामील झाले होते. एस. एम. जोशी, सेनापती बापट, क्रांतिसिंह नाना पाटील, ना. ग. गोरे, केशवराव जेधे, रघुनाथ खाडिलकर, यशवंतराव मोहिते, लालजी पेंडसे इ. नेत्यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीला नेतृत्व आणि समर्थन लाभले होते. विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि जनता असा संपूर्ण मराठी भाषिक समाज संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या आंदोलनात समाविष्ट करून घेण्याचे अलौकीक, अनन्यसाधारण कार्य या नेत्यांनी केलेले आहे.

१९५६ पासून संयुक्त महाराष्ट्र समितीने आपले आंदोलन तीव्र करण्याचे ठरविले. मुंबई शहर आणि ग्रामीण भागात संयुक्त महाराष्ट्र समितीचे आंदोलन सुरू झाले. मुंबई, पुणे, कोल्हापूर, बेळगाव निपाणी, नाशिक इ. शहरात उग्र निदर्शने झाली ग्रामीण भागातील जनता उत्स्फूर्तपणे या आंदोलनात सामील झाली. हजारो कार्यकर्ते सत्याग्रहात सामील झाले होते.८

## १९५७ ची निवडणूक :

ना. ग. गोरे यावेळी तिकडे गोव्याच्या तुरूंगात होते आणि इकडे महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राचा लढा तीव्र झाला. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीचे वेध सुरू झाले. संयुक्त महाराष्ट्र समितीने त्यांना या निवडणूकीमध्ये उमेदवारी देण्याचे ठरविले. ना. ग. गोरेंना संयुक्त महाराष्ट्र समितीच्यावतीने दक्षिण रत्नागिरी अगर पुणे शहरातून लोकसभेसाठी उभे करण्याचे ठरले. आग्वादच्या तुरूंगातून नामनिर्देशन पत्रावर ना. ग. गोरेची स्वाक्षरी घेऊन येण्याचीही व्यवस्था करण्यात आली होती. पण सुदैवाने त्याचवेळी ना. ग. गोरेंची आग्वादच्या तुरूंगातून सूटका झाली. ना. ग. गोरेंनी दक्षिण रत्नागिरीऐवजी पुणे शहरातून लोकसभेची निवडणूक लढविणे पसंत केले. ना. ग. गोरे संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे प्रजासमाजवादी उमेदवार म्हणून पुणे शहरातून लोकसभेवर निवडून गेले. तेथे त्यांनी आपल्या विचारांची छाप पाडली. त्यांनी संरक्षणाच्या समस्येत विशेष लक्ष घातले. चिनच्या आक्रमणाच्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये काही घटक पक्षांनी तडजोडीची भूमिका घेतली ते ना. ग. गोरेंना आवडले नाही. देशाच्या सार्वभौमत्वाच्या, रक्षणाच्या प्रश्नावर त्यांना कुठलीही तडजोड मान्य नव्हती राष्ट्रीयत्वाच्या प्रश्नावर तडजोड करणाऱ्यांनी समिती सोडावी असे त्यांचे मत होते. दक्षिणेमध्ये हिंदी विरोधी प्रखर आंदोलन सुरू झाले तेव्हा ना. ग. गोरेंना दु:ख झाले. बेभान होऊन कार्य करा, परंतु भान ठेवून भूमिका घ्या, हा ना. ग. गोरेंचा सर्वांना सल्ला होता. हिंदीचा अट्टाहास आणि हिंदीविरोधी दुराग्रह यामध्ये ना. ग. गोरेंनी संघर्ष पाहिला तेंव्हा त्यांनी खंबीरपणे देशास सांगितले ''एक भाषा, दोन देश अशी परिस्थिती निर्माण करण्याऐवजी मी एक देश दोन भाषा ही तडजोड मान्य करीन.'' भाषिकवादाने बेभान झालेल्यांना हा सल्ला रुजला नाही. मात्र ना. ग. गोरे यांची भूमिका विवेकी होती. ९

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चिटणीसपदाची जबाबदारी एसेमना स्वीकारावी लागली. संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार प्रचंड बहुमताने पार्लमेंटमध्ये निवडून गेले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील हा आनंदाचा क्षण होता. कारण सर्व जाती जमातींच्या लोकानी कोणताही भेदभाव न मानता संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून दिले होते. १०

संयुक्त महाराष्ट्र या विषयावर बहुसंख्य पक्षांमध्ये एकमत होते प्रत्येकजण आपापल्या परीने कार्यरत होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील विविध प्रवाह आणि तो लढा म्हणजे एक प्रकारे लोकशाही समाजवादाचाच भाग कसा आहे यासंबंधी ना. ग. गोरे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत त्यांच्यामध्ये याविषयी चर्चा होत असत. ना. ग. गोरे गोव्याच्या तुरूंगातून सुटून आले आणि अनेक महत्प्रसंगानी समृध्द बनलेले त्यांचे जीवन त्यांनी पुन्हा संयुक्त महाराष्ट्र लढ्यास समर्पित केले. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकांमध्ये समाजवादी पक्षास पराभव पत्करावा लागला होता. पण संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याने पक्षाचे अनेक धुरंधर संसदेत निवडून आले. ना. ग. गोरे हे त्यांच्यापैकी एक होते. ना. ग. गोरेंनी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत नेहरूंशी चर्चा केली. ना. ग. गोरेंच्या मते, नेहरूंना, मुंबईवर महाराष्ट्राचा हक्क आहे हेच मुळात मान्य नाही. न. ग. गोरेंनी नेहरूंकडे संयुक्त महाराष्ट्राची बाजू मांडली. ११

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी महाराष्ट्राने जो लढा दिला त्याबद्दल आणि विशेषतः एसेम जोशींनी या लढयाचे ज्या रीतीने नेतृत्व केले त्याबद्दल ना. ग. गोरेंना फार अभिमान वाटत असे. १९५७ च्या निवडणूकीत समितीच्या अंतर्गत जे मतभेद झाले त्यासंबंधीची माहीती ना. ग. गोरेंना सुटून आल्यावर समजली. संयुक्त

आघाडीत काम करणे ना. ग. गोरेंना जमत नसे आणि ते आपली मते स्पष्टपणे मांडीत. मात्र संयुक्त आघाडीत काम करणे ना. ग. गोरेंना जमत नसे आणि ते आपली मते स्पष्टपणे मांडत असत. मात्र संयुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट सफल होईपर्यंत सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे अशीच त्यांची भूमिका होती. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती १ मे १९६० ला झाली. त्यानंतर समितीतील मतभेद वाढू लागले आणि अखेर प्रजासमाजवादी पक्षाने समितीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळीच सीमा प्रश्न सोडविण्याचा आग्रह धरावा, ही एसेमची भूमिका महाराष्ट्रात प्रभावी ठरली नाही याबद्दल ना. ग. गोरेंना खंत वाटत असे. लोकशाहीच्या मार्गाने सीमा भागातील मराठी जनतेने आपले मत पंचवीस वर्षे नि.संदिग्धपणे व्यक्त केले, असताही त्यांना न्याय मिळाला नाही, आपण तो त्यांना मिळवून देऊ शकलो नाही. याबद्दल ना. ग. गोरे अनेकदा व्यथित झाले. १२

**व्दिभाषिक राज्य :-**

केंद्र सरकारने महाराष्ट्रावर व्दिभाषिक राज्य लादले. ते संयुक्त महाराष्ट्र समितीला पटले नाही. एका बाजूला व्दिभाषिक मुंबई राज्याचे विभाजन लवकर घडवून आणावे यासाठी समिती व परिषद एकत्रित येऊन प्रयत्न करीत होती तर दुसऱ्या बाजूला व्दिभाषिक राज्य चिरकाल टिकवण्याची भाषा करीत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण पश्चिम महाराष्ट्रातल्या पडझड झालेल्या काँग्रेसच्या बाले किल्ल्यांची डागडुजी करून पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न करीत होते. काँग्रेस श्रेष्ठी व्दिभाषिक राज्य मोडल्यास १९६२ सालच्या निवडणूकीत महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला बहुमत मिळेल किंवा नाही याबद्दल साशंक होते. व्दिभाषिक राज्याच्या निर्णयामुळे महाराष्ट्र आणि गुजरातमधील लोक समाधानी झाले नव्हते. उलट काँग्रेस

पक्षाविरूद्ध या निर्णयामुळे असंतोष निर्माण झाला लोकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यामुळे काँग्रेस श्रेष्ठींना व्दिभाषिकाचे विभाजन करण्याशिवाय पर्याय उरला नाही. व काँग्रेस श्रेष्ठींनी व्दिभाषिक राज्याचे विभाजनकरण्याचा निर्णय घेतला याविषयी एस. एम. जोशींनी प्रतिक्रिया दिली त्यांना काँग्रेस श्रेष्ठींच्या या निर्णयाबद्दल बरे वाटले. संयुक्त महाराष्ट्राची त्यांनी जबाबदारी स्वीकारली होती. यांच्या मते ना. ग. गोरे गोव्याच्या तुरूंगात गेल्यामुळे त्यांना ही जबाबदारी पत्करावी लागली. १३

## संयुक्त महाराष्ट्र निर्मिती

१९५७ च्या निवडणूक निकालावरून महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचे महत्व वाढू लागले आहे. हे केंद्रिय नेत्यांनी ओळखले. विधानसभा, लोकसभा या निवडणुकांत झालेली काँग्रेसची घसरण, दिल्लीत काढलेला मोर्चा, सीमा - लढा, विधानसभेतील विरोधी पक्षाची संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची झालेली मागणी समितीची उग्र व अखंडपणे चाललेली निदर्शने इ. कारणांमुळे संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती करणे आवश्यक आहे. असे काँग्रेस नेत्यांना वाटू लागले.

मुंबई महाराष्ट्राला न देता वेगळी ठेवण्याची भूमिका केंद्र सरकारने उचलून धरली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला मुंबईतील बडया धनिकांचा व उद्योगपतींचा प्रखर विरोध होता. केंद्रसरकारवर या धनिक वर्गांचे जबरदस्त वजन असल्यामुळे मुंबई स्वतंत्र ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी होऊ लागलेला होता. परंतु मुंबई वेगळी न ठेवता व्दिभाषिक विशाल मुंबई राज्याची योजना पुढे आली. मुंबई राज्याला वेगळे वळण न ठेवता मुंबईसह महाव्दिभाषिक राज्याची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्रातील आणि गुजरातमधील काँग्रेस नेत्यांनी दिल्लीतील काँग्रेस श्रेष्ठींचा हा निर्णय शिरोधार्य नानून पक्षीय शिस्तीचे काटेकोरपणे पालन केले.

परंतु महाराष्ट्रातील विरोधी पक्ष स्वस्थ बसले नाहीत. सर्व विरोधी राजकीय पक्षांनी एकजूट करून संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली. संयुक्त महाराष्ट्र समिती विरोधी पक्षातील एस. एम. जोशी, ना. ग. गोरे. उध्दवराव पाटील, केशवराव जेधे, खाडिलकर, यशवंतराव मोहिते, प्र. के. अत्रे, लालजी पेंडसे, शंकरराव मोरे इ. मातब्बर मंडळी होती. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर संयुक्त महाराष्ट्र समितीचे तीव्र आंदोलन उभारले. सभा, मोर्चे, निदर्शने, बंद इ. मार्गांनी महाराष्ट्रीय जनतेला व्दिभाषिक राज्यामुळे झालेला अन्याय त्यांनी पटवून दिला. संयुक्त महाराष्ट्र समितीने दिल्ली येथे दोन वेळा मोर्चा काढला आणि दिल्लीकरांना महाराष्ट्रीय लोकांवर झालेला अन्याय पटवून दिला. पं. नेहरूंच्या समोर प्रतापगडावर निदर्शने केली. अशा रीतीने सारा महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आंदोलनाने पेटून उठला. मोरारजी सरकारने अनेकवेळा लाठीहल्ला केला, गोळीबार केला, हजारो सत्याग्रहींना अटक झाली. १०५ लोक गोळीबारात प्राणास मुकले आणि हुतात्मे झाले. अखेर दिल्लीच्या काँग्रेस श्रेष्ठींना मराठी लोकांची भावना समजून आली. शेवटी नाइलाजाने लोकमता नुसार त्यांना मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती करावी लागली.

चंदीगड येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रश्नावर निर्णय घेण्यात आला. गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीत यशवंतराव चव्हाण, स. का. पाटील, जिवराज मेहता, डॉ. गोपाळ खेडकर इ. सदस्य होते. समितीच्या बैठकीला बोलाविणे आणि मार्गदर्शन करणे हे काम यशवंतराव चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीला मराठवाडा आणि विदर्भ यांचा हार्दिक पाठिंबा होताच समितीने आपला अहवाल तयार केला. संयुक्त महाराष्ट्र निर्माण केल्यानंतर त्यास 'मुंबइ राज्य' हे

नाव द्यावे असे या समितीचे मत होते. परंतु संयुक्त महाराष्ट्र समितीने 'महाराष्ट्र' हेच नाव द्यावे असा आग्रह धरला. शेवटी 'महाराष्ट्र' हे नाव निश्चित झाले. मुंबई पुनर्रचना विधेयक विधानसभेत मांडण्यात आले. विधेयक बहुमताने पास झाले आणि १ मे १९६० रोजी 'संयुक्त महाराष्ट्र' स्थापन झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ना. ग. गोरे यांचे योगदान महत्वाचे आहे. १४

## ब) गोवा मुक्ती चळवळ

भारतात सत्तांतर झाले तेव्हा ब्रिटीशांप्रमाणेच फ्रेंचानीही आपली सत्ता सोडून दिली. फ्रेंचांच्या ताब्यातली पाँडेचरी, चंद्रनगर आणि माहे ही शहरे व लगतचा मुलूख भारताच्या स्वाधीन करण्यात आला. गोवा, दमण आणि दीव या ठिकाणी पोर्तुगीजांचे राज्य होते. पोर्तुगीजांची राजवट जुलमी होती. त्यांनी जनतेचे आर्थिक शोषण तर केलेच, पण त्याचबरोबर अनेकांना सक्तीने धर्मांतरही करावयास लावले. पोर्तुगीजांच्या या धार्मिक अत्याचारांमुळे काही थोडी कुटुंबे रत्नागिरी जिल्हयाच्या दक्षिण भागात कायमची रहावयास गेली, पण बहुसंख्य गरीब जनता मात्र चिवटपणे अन्यायाचा प्रतिकार करीत तिथेच राहिली. स्वधर्म आणि स्वभाषा टिकविताना गोव्यातील जनतेला अनन्वित छळाला तोंड दयावे लागले. उघड प्रतिकार करणे शक्य नव्हते. परंतु गोव्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करून गोव्यातील जनतेचे प्रबोधन चालू ठेवले आणि गोव्याच्या सांस्कृतिक जीवनाचे वैशिष्ठ्य व वैभव कसेबसे टिकवून धरले. भारतातील स्वातंत्र्य चळवळीबद्दल गोव्यातील कार्यकर्त्यांना आकर्षण वाटत होते, पण पोर्तुगीजांच्या पाशवी जुलमामुळे गोव्यातील राजकीय आकांक्षा दडपून गेली होती. भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील नेत्यांचा गोव्याच्या या लढयाशी संबंध होताच या नेत्यांपैकी समाजवादी पक्षाचे प्रमुख नेते आणि भारताच्या स्वातंत्र्यलढयातील १९३०, ३२ व

४२ या तीनही चळवळीत अग्रभागी राहून तुरूंगवास सोसलेले ना. ग. गोरे यांनी या चळवळीत सहभागी व्हावयाचे ठरविले, गोव्यातील जनता स्वतंत्र्य होण्यासाठी प्रयत्न करीत असताना भारतातील स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनी त्यांना साथ दिली पाहिजे, अशी त्यांनी भूमिका मांडली. ही भूमिका अनेकांना मान्य झाली आणि पुण्यात ''गोवा विमोचन सहाय्यक समिती'' स्थापन झाली. १५

गोव्यातील पोर्तुगीज राजवटीच्या चारशे वर्षाच्या काळात पोर्तुगालमध्ये राजसत्ता अस्तित्वात होती. आणि राजाश्रयाखाली रोमन कॅथलिक चर्चेने धर्मसमीक्षण सभा स्थापन करून, गोव्यातील हिंदूंना बाटवण्याचा आणि ख्रिस्ती धर्म न स्वीकारणाऱ्या हिंदूंचा छळ करून उच्छाद मांडला होता. १८७० पासून गोव्यात प्रसिध्द होणाऱ्या मराठी नियतकालिकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्याचा जिवापाड प्रयत्न केला. १९१२ साली 'भारत' हे पोर्तुगीज मराठी व्दिभाषिक साप्ताहिक सुरू करणारे हेगडे देसाई आणि 'प्रभात' साप्ताहिक सुरू करणारे डॉ. पुरूषोत्तम वामन शिरगावकर यांचा गोव्याला जागृत करण्यात मोठा वाटा होता. सुरूवातीला डॉ. राम मनोहर लोहिया यांनी गोव्यात सत्याग्रह केला. लोहियांनी लढयाचे रणशिंग फुंकले.

गोव्यातील चळवळीला जोर देण्यासाठी मुंबईत असलेले गोवा नॅशनल काँग्रेसचे संयुक्त चिटणीस जॉर्ज वाझ यांनी लोहियांमार्फत गांधीजींशी संपर्क साधण्यासाठ लक्ष्मीदास बोरकरांना दिल्लीत पाठवले. स्वातंत्र्योत्तर काळात गोव्याचे स्थान कोणते? आणि कोठे असावे? यावरून चळवळीची अधिक शकले पडू नयेत म्हणून गांधीजींनी लक्ष्मीदास बोरकरांना सांगितले की, भारतीय राज्यघटनेने मान्य केलेल्या स्वंयनिर्णयाच्या तत्त्वानुसार आपले भारतीय संघराज्यात कोणते स्थान

असावे हे गोव्यातील लोकच ठरवतील. त्यात महाराष्ट्र किंवा कर्नाटकचे नेते हस्तक्षेप करणार नाहीत. अहिंसेवर श्रध्दा असणाऱ्या गोवेकरांनी लोकांमध्ये उघडपणे वावरून कार्य करीत राहावे आणि शक्य असेल तर सामुदायिक सत्याग्रह करावा आणि ते शक्य नसेल तर वैयक्तिकरित्या यथाशक्ती पोर्तुगीज राजवटीचा प्रतिकार करावा असा गांधीजींनी सल्ला दिला. गोवा मुक्त होणे त्यांच्या दृष्टीने सर्वांत महत्वाचे होते.१६

ना. ग. गोरे सावंतवाडी, बेळगाव येथे नेहमी जात. त्यावेळी त्यांना गोव्यातील कार्यकर्ते भेटत असत. गोव्यामध्ये १९४६ साली डॉ. राममनोहर लोहिया गेले होते, त्यावेळी त्यांच्याभोवती पुरूषोत्तम काकोडकर, शिरोडकर, भेंब्रे आदि कार्यकर्ते भेटले. गोव्यातील पोर्तुगीज सरकारने डॉ. लोहियांना अटक करून भारतीय हद्दीत आणून सोडले. त्यावेळी चळवळ करणाऱ्या काकोडकर, ब्रॅगान्झा कुन्हा, शिरोडकर आदी कार्यकर्त्यांना पोर्तुगीज सरकारने दीर्घ मुदतीच्या शिक्षा करून काही जणांना पोर्तुगालमध्ये आणि काही जणांना पश्चिम आफ्रिकेतील पोर्तुगीज वसाहती असलेल्या देशातील तुरूंगात ठेवले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर गोव्यातील जनतेची स्वातंत्र्याची आकांक्षा तीव्र झाली. गोव्यातील काही कार्यकर्ते मुंबईत होते. त्यांच्यापैकी पीटर अल्वारीस हे ना. ग. गोरे यांचे समाजवादी पक्षातील सहकारी गोव्यात जात. तेथील स्वातंत्र्य चळवळीसाठी उत्सुक असलेल्या सर्व कार्यकर्त्यांशी त्यांचा निकटचा संबंध होता. ते ना. ग. गोरेंना १९५३ साली म्हणाले, 'भारताला स्वातंत्र्य मिळून येत्या १५ ऑगस्टला सहा वर्षे पूर्ण होतील पण आम्ही गोवेकर अद्याप पोर्जुगीज सरकारच्याच जोखडाखाली आहोत. आमच्या लढयाला भारत सरकार मदत करीत नाही. पण भारतातील जनतेने तरी आम्हाला पाठिंबा दिला पाहिजे.' ना. ग. गोरेंना हे पटत होते. पण काय करावे, ते सुचत नव्हते.

१९५४ साली कारवारला गोमंतक साहित्य संमेलन भरले होते, ना. ग. गोरे संमेलनाचे अध्यक्ष होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी पुढील विचार मांडले, 'गोव्याच्या जनतेचे स्वातंत्र्याचे स्वप्न लवकर साकार झाले पाहिजे आणि भारताचे सरकार जर यासाठी पावले उचलीत नसेल तर भारतीय जनतेने पुढाकार घेऊन काहीतरी केले पाहिजे.' कारवारहून परत आल्यावर ना. ग. गोरे एस. एम. जोशींना भेटले आणि म्हणाले, 'गोव्यात सत्याग्रहींची तुकडी घेऊन जावी असे मला तीव्रतेने वाटते.' काही दिवसांनी ना. ग. गोरेंनी पुण्यात विरोधी पक्षाच्या पुण्यातील नेत्यांची बैठक बोलाविली आणि बैठकीच्या सुरूवातीस, 'गोव्यात सुरू झालेल्या मुक्तिसंग्रामास आपण पाठिंबा दिला पाहिजे.' असा विचार मांडला. त्यावर चर्चा होऊन गोवा विमोचन सहायक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तात्यासाहेब जेधे समितीचे अध्यक्ष झाले आणि ना. ग. गोरे व जयंतराव टिळक हे दोघे समितीचे सरचिटणीस झाले. ना. ग. गोरे यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाऊन त्यांचा सत्याग्रहाचा विचार कार्यकर्त्यांसमोर मांडला. सेनापती बापटांना हे समजल्यावर ते ना. ग. गोरे यांच्याबरोबर सत्याग्रहीच्या पहिल्या तुकडीत जाण्यास तयार झाले.१७

ना. ग. गोरे यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दौरे काढून गोव्याचा मुक्तिसंग्राम हा भारतातील जनतेने अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गाने चालविला पाहिजे, ही भूमिका समजावून सांगून सत्याग्रहाच्या चळवळीस अनुकूल वातावरण निर्माण केले. त्यानंतर ना. ग. गोरेंनी गोव्यात जाऊन सत्याग्रह करण्याचा बेत निश्चित केला. गोवा विमोचन समितीने ना. ग. गोरे यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींची पहिली तुकडी पाठविण्याचे ठरविले. सर्वत्र उत्साहाचे व देशभक्तीने भारलेले वातावरण निर्माण झाले. सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी अनेक तरूण पुढे येऊ लागले. स्वांतत्र्य लढयाच्यावेळो जागृत झालेली समर्पणभावना पुन्हा नव्याने उफाळून आली.

गोवा मुक्तीसाठी स्वतंत्र भारतातील सत्याग्रही गांधीजींच्या अहिंसक मार्गाने प्रयत्न करणार, ही कल्पनाच अभिनव होती, उदात्त होती. 'शासन जर तातडीने कृती करीत नसेल तर जनतेने आपले कर्तव्य केले पाहिजे' अशी भूमिका मांडून ना. ग. गोरे यांनी सत्याग्रही तुकडी घेऊन गोव्यात जाण्याचे ठरविले. ना. ग. गोरे, सेनापती बापट इ. सत्याग्रही पुण्याहून कोल्हापूर - बेळगाव मार्गे गोव्याकडे गेले. वाटेत प्रचंड सभा होऊन बलिदान करावयास सिध्द झालेल्या या सत्याग्रहींना जनतेने प्रेमाने निरोप दिला. ना. ग. गोऱ्यांच्या नेतृत्वाखालील चोपन्न जणांच्या तुकडीने १८ मे १९५५ ला दोडामार्ग ओलांडून गोव्याच्या हद्दीत प्रवेश केला आंबड गावाजवळ पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी त्यांना अडविले तेव्हा, 'पोर्तुगीजांनी गोवा सोडून जावे', असे निवेदन ना. ग. गोरे यांनी त्यांना दिले.

सेनापती बापट यांच्यामुळे काही सशस्त्र लोक या तुकडीत असावेत अशी पोर्तुगीज अधिकाऱ्यांची समजूत होती. खादीचे धोतर, सदरा, कोट व टोपी घातलेले वृध्द पंच्याहत्तर वर्षे वयाचे तात्या बापट हेच सेनापती बापट आहेत यावर त्यांचा विश्वासच बसेना. सत्याग्रही शांतपणे घोषणा देत होते. ना. ग. गोरे त्यांचे नेतृत्व करीत चालले होते. पोर्तुगीज अधिकारी मॉन्तेरो याला सत्याग्रह म्हणजे काय ते ही समजत नव्हते. पण पोर्तुगीजसत्तेला हे आव्हान आहे, हे मात्र त्याला उमगले होते. मॉन्तरोने आणि त्याच्या हाताखालच्या शिपायांनी सत्याग्रहीना दंडुक्यांनी व बाबूंनी अमानुष मारपीट सुरू केली. ना. ग. गोरे यांना खाली पाडून त्यांच्या छातीवर लाथा मारण्यात आल्या. सेनापती बापट व अन्य सत्याग्रहींना खूप मारपीट केल्यावर जीपमधून भारताच्या सरहद्दीवर सोडून देण्यात आले. ना. ग. गोरे यांना अटक करून तुरूंगात टाकले. १८

ना. ग. गोरेंनी पुढाकार घेऊन केलेल्या या सत्याग्रहामुळे गोव्यातील स्वातंत्र्य चळवळीत नवे चैतन्य निर्माण झाले. भारतात ज्यावेळी ना. ग. गोरे यांना अमानुष मारहाण झाल्याची वार्ता आली त्यावेळी अनेकांनी तीव्र संताप व्यक्त केला. पहिल्या तुकडीचे ना. ग. गोरेंनी नेतृत्व करण्याचे सांगितले तेव्हा शिरूभाऊ लिमयेंनी ते दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व करणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. गोवा विमोचन सहायक समितीने ठरल्याप्रमाणे शिरूभाऊ लिमये यांच्या नेतृत्वाखाली दुसरी तुकडी पाठविली. त्याही तुकडीस भीषण मारहाण झाली. शिरूभाऊंनाही जबर मारहाण झाली. तुकडीचे नेते म्हणून शिरूभाऊना अटक करण्यात आली. आणि बाकीच्या सत्याग्रहींना महाराष्ट्राच्या हद्दीत ढकलून देण्यात आले. गोव्यामध्ये दडपशाही, मारहाण, लांब मुदतीच्या शिक्षा यांना न भिता चळवळ चालू राहिली. सुधाताई जोशी या मुळच्या गोव्याच्या राहणाऱ्या त्यांनी गुप्तपणे, सावंत वाडीमार्गे गोव्यात प्रवेश करून पोलिसांना चकवून म्हापशाला गोवा कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे उद्‌घाटन केले. त्यांना पोलिसांनी मारहाण केली आणि नंतर अटकही केली. भारतातील सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रही तुकड्या गोव्यात गेल्या. मधु लिमये, जगन्नाथराव जोशी, त्रिदिप चौधरी, वि. ध. देशपांडे आदि नेत्यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींच्या तुकड्या गोव्यात गेल्या. काही तुकडयांवर पोर्तुगीज सैनिकांनी गोळीबार केला आणि गोळीबारात काही सत्याग्रही हुतात्मे झाले. सर्व तुकड्यांच्या नेत्यांना अटक झाली. १९

ना. ग. गोरे नेतृत्व करीत असलेल्या पहिल्या तुकडीला झालेल्या जबर मारहाणीच्या बातम्या मुळे शिरूभाऊ लिमये यांच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या तुकडीतील सत्याग्रही दुप्पट निर्धाराने गोव्यात गेले. ७१ जणांची दुसरी तुकडी होती. त्यांनाही भयंकर मारहाण करण्यात आली. शिरूभाऊ लिमयेंना एका बाजूला नेऊन बेदम

मारण्यात आले. सत्याग्रहींची डोकी फुटली तरी त्यांनी हातातले झेंडे सोडले नाहीत. या सत्याग्रहाच्या निमित्ताने महात्मा गांधींच्या सत्याग्रहातील निर्भयतेचे भारताला पुन्हा दर्शन घडले. भारतातील विरोधी नेत्यांच्या नेतृत्वाखाली एका मागोमाग एक तुकड्या सत्याग्रह करून गोव्यात जात होत्या. पोर्तुगीज पोलीस भीषण मारपीट करीतच होते. पण गोवा मुक्त करण्याचा जनतेचा निर्धार अधिकाधिक दृढ होऊ लागला.

१५ ऑगस्ट १९५५ ला प्रचंड प्रमाणात सामुदायिक सत्याग्रह करण्याचा निर्णय गोवा विमोचन समितीने घेतला. विष्णुपंत चितळे या कम्युनिस्ट नेत्यांनी या सत्याग्रहाचे नेतृत्व करावे असे ठरले. महाराष्ट्राच्याच नव्हे तर, देशाच्या कानाकोपऱ्यातून सत्याग्रही आत्मार्पण भावनेने स्वातंत्र्यादिनादिवशीच सत्याग्रह करणार होते. वातावरण विलक्षण तप्त झाले होते. ११ ऑगस्टपासून सत्याग्रहींच्या तुकडया पुण्यात दाखल होऊ लागल्या. सत्याग्रहींच्या जेवणासाठी पुण्याला घरा-घरातून लोकांनी पोळी-भाजी सत्याग्रहींना आणून दिली. लोक पक्षभेद विसरले होते. कार्यकर्ते एकजुटीने काम करीत होते.

१५ ऑगस्टला गोव्याच्या सरहद्दीवर हजारो सत्याग्रही जमले. गोळीबार होण्याची भिती होती. पण सत्याग्रहींना मरणाची भिती वाटत नव्हती. ते गोवा स्वतंत्र करण्याच्या ध्येयाने धुंद झाले होते. आणि एका आवाजात तालबध्द घोषणा देत होते. गगनभेदी घोषणांतून गोव्याच्या स्वातंत्र्याचा पुकार केला जात होता.

पोर्तुगीज लष्कर सरहद्दीजवळ सज्ज होते. सत्याग्रही पुढे येताच त्यांनी गोळीबार सुरू केला. त्यावेळी एक गोळी चितळयांच्या कानाजवळून गेली. दुसरी वसंतराव ओकांच्या मांडीत घुसली. कर्नाल सिंग, महांकाळ आणि चौधरी हे तीन

क्रांतीवीर तसेच पुढे गेले आणि गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी हौतात्म्य पत्करले. तेरेखोलच्या बाजूला हिरवेगुरूजी हे सत्याग्रहींचे नेतृत्व करीत होते. ते आणि शेषनाथ वाडेकर यांना पोर्तुगीजांच्या गोळीने टिपले. गोव्याच्या स्वांतत्र्याचा जयजयकार करीत त्या दोघांनी आत्मार्पण केले. सहोदराबाई ही महिला गोळयांचा वर्षाव होत असताना हातात राष्ट्रध्वज घेऊन बेहोषपणे पुढे गेली.

गोवा विमोचन समितीच्या नेत्यांनी काही वेळाने सत्याग्रह थांबविला. परंतु बेळगावहून पायी निघालेली प्रा. दंडवते यांच्या नेतृत्वाखालील सत्याग्रही तुकडी मात्र गोव्याच्या दिशेने चालत राहिली. वाटेत धुवांधार पाऊस पडत होता. पायाला चिकटून जळवा रक्तशोषण करीत होत्या, पण हे सत्याग्रही बेहोषीने चालतच राहिले. या सत्याग्रही तुकडीने गोव्यात प्रवेश केल्यावर पोलिसांनी त्यांना घेरले. लाठया काठयांनी सगळयांना मारले. मधु दंडवते, बंडू गोरे, प्रभाकर कुंटे व साक्रीकर या तरूण कार्यकर्त्यांना खूप तडाखे मारण्यात आले. आणि नंतर भारताच्या हद्दीत त्याना ढकलून देण्यात आले.

१५ ऑगस्टच्या या सामुदायिक सत्याग्रहानंतर गोवा विमोचन समितीने सत्याग्रह आंदोलन मागे घेतले. पोर्तुगीज सरकारचे दमनचक्र फिरतच राहिले. गोव्यात तर धरपकड, मारहाण हे सत्र चालूच होते. ना. ग. गोरे आणि शिरूभाऊ लिमये यांच्यावर लष्करी कोर्टात खटला चालला आणि त्या दोघांना दहा-दहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली अशीच शिक्षा मधू लिमये, त्रिदीब चौधरी, जगन्नाथराव जोशी आदी नेत्यांना ठोठावण्यात आली. २०

ना. ग. गोरेंनी स्वातंत्र्यलढयात आठ वर्षापेक्षा अधिक कारावास भोगला होता. त्यांचे आई - वडिल वृध्दापकाळामुळे फार थकलेले होते. आपण तुरूंगातून

येईपर्यंत घरची अवस्था काय होईल ही चिंता त्यांना लागली होती. काही वेळा त्यांचे चित्त विचलित होत होते. परंतु शिरूभाऊ लिमये हे त्यांना धीर देत असत त्यांच्या मनाला ते आधार देत. आग्वादच्या किल्ल्यात या सर्व नेत्यांना ठेवण्यात आले. तेथे गोव्यातीलही काही प्रमुख कार्यकर्ते त्यांच्या समवेत होते. आग्वादला नेल्यावर मधु लिमये, शिरूभाऊ या मित्रांच्या समवेत राहताना ना. ग. गोरेंचे मन शांत झाले. तेथे त्यांनी 'अमेरिकेच्या इतिहासा' वरील काही ग्रंथ मागवून त्यांचा अभ्यास सुरू केला. गोव्याच्या तुरूंगात १९ महिने काढल्यावर ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या मध्यस्थीमुळे ना. ग. गोरे व त्यांचे सहकारी यांची सुटका झाली. २१

गोव्याच्या मुक्तीसाठी सामुदायिक सत्याग्रह करण्याची मूळ कल्पना ना. ग. गोरे यांची होती. कारवार येथे भरलेल्या गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून त्यांनी ही सूचना केली होती. गोवा नॅशन्ल काँग्रेसचे त्या वेळचे अध्यक्ष पीटर अल्वारीस यांनी ना. ग. गोरेंची ही सूचना उचलून धरली. पण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहर लाल नेहरू यांचा गोमंतकीय सोडून इतर भारतीयांनी सत्याग्रह करायला विरोध होता. त्यामुळे १५ ऑगस्ट १९५४ रोजी आयोजित केलेला सत्याग्रह गोमंतकीयांपुरता मर्यादित ठेवावा लागला होता. तेरेखोलच्या ऐतिहासिक किल्ल्यावर सत्याग्रहींची तुकडी पाठविण्याची सूचना जयानंद मठकर यांनी त्यावेळी पीटर अल्वारीस यांना केली. त्यांनी ती मान्य केली. श्री आल्फ्रेड आल्फान्सो यांच्या नेतृत्वाखाली १५ ऑगस्ट १९५४ रोजी तेरेखोलच्या किल्ल्यावर गोमंतकीय सत्याग्रहींची तुकडी पाठवण्याचे निश्चित झाले. त्या सत्याग्रहींना निरोप देण्याचा समारंभ ना. ग. गोरे यांच्या अध्यक्षतेखाली शिरोडे येथे पार पडला. वीस सत्याग्रहींच्या तुकडीला निरोप देण्यासाठी शिरोडयाहून दोन हजारांचा जनसमुदाय तेरेखोलच्या सीमेपर्यंत गेला होता. मठकर ना. ग. गोरेंना

म्हणाले, "गोवा सरकारने हे सत्याग्रही म्हणजे खाजगी वेषातील सैनिकच गोव्यात प्रवेश करणार असल्याचा प्रचार चालविला आहे. गोव्यातील अधिकाऱ्यांनी तुम्हाला या वेषात बघितल्यावर सैनिकच सत्याग्रहींच्या रूपाने गोव्यावर चाल करून येत असल्याची त्यांची खात्री होईल." आणि प्रत्यक्षात तेरेखोलला एक वेगळाच अनुभव आला. सत्याग्रही म्हणजे खाजगी वेषातील सैनिक समजून तेरेखोल किल्ल्यावर गोवा सरकारचे पोलीस शरण आले व किल्ला सत्याग्रहींच्या ताब्यात देऊन निघून गेले. पाचसहाशे लोकवस्तीचा तेरेखोल गाव एखाद-दुसरे हिंदुचे घर वगळता सारी वस्ती ख्रिश्चनांची होती. पण घरादारांना कुलूपे लावून गावकरी निघून गेलेले संपूर्ण गाव निर्मनुष्य होते. पुढे काय करावयाचे ते ठरविण्यासाठी सत्याग्रहींनी परत आपल्या हद्दीत येऊन ना. ग. गोरेंशी विचारविनिमय केला. ना. ग. गोरेंनी सत्याग्रहींना किल्ल्यातच राहण्याचा सल्ला दिला आणि गोवा नॅशनल काँग्रेसचे अध्यक्ष पीटर अल्वारिस यांच्याशी संपर्क साधून पुढील निर्णय कळवितो असे सांगितले. पोर्तुगीजांच्या सत्तेतून मुक्त झालेला तेरेखोलमध्ये स्वतंत्र गोव्याचे सरकार गोवा नॅशनल काँग्रेसने स्थापन करावे असा एक विचार त्यावेळी ना. ग. गोरेंच्या मनात होता. पण पीटर अल्वारीस यांच्याशी संपर्क साधून तातडीने याची कार्यवाही करणे शक्य नव्हते. दुसरे असे की अशा सरकारला भारत सरकारचा पाठिंबा मिळण्याची त्यावेळी खात्री वाटत नव्हती. पोर्तुगीज पोलिसांनी सोडून दिलेले तेरेखोल परत ताब्यात घेण्याची कार्यवाही गोव्यातील पोर्तुगीज गव्हर्नरने तत्परतेने केली व दुसरा दिवस उजाडण्यापूर्वीच तेरेखोलवर लष्कर पाठवून तेरेखोलचा पुन्हा ताबा घेतला.

या सत्याग्रहानंतर पंडीत नेहरूंच्या विरोधाला न जुमानता भारतीयांनी गोमंतकाच्या मुक्तीसाठी सत्याग्रह केला. भारतीय सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीचे

नेतृत्व ना. ग. गोरेंनी केले. ना. ग. गोरेंच्या या पहिल्या तुकडीला निरोप देण्याचा समारंभ त्या वेळी सावंतवाडी येथील गांधी चौकात बॅ. नाथ पै यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडला. या निरोपसभारंभात नाथ पै म्हणाले, ''ना. ग. गोरे व सेनापती बापट यांच्या नेतृत्वांमुळे गोमंतकाच्या या मुक्तिलढ्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. गोमंतकाची मुक्ती आता दूर नाही.'' २२

भारतात लोकशाही यशस्वी होण्यासाठी राज्यांची पुनर्रचना भाषेच्या तत्त्वावर व्हावी, अशी ना. ग. गोरे यांची भूमिका होती आणि म्हणूनच त्यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेत सुरूवातीपासून हिरीरीने भाग घेतला. परंतु याच सुमारास दुसऱ्या एका लढयाकडे ते ओढले गेले तो म्हणजे गोव्याचा मुक्तिसंग्राम १९५४ मध्ये गोव्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या. त्यावेळी भारताने या मुक्तिसंग्रामास सहाय्य करून गोव्याला पोर्तुगीजांच्या जोखडापासून सोडविले पाहिजे, असे ना. ग. गोरेंनी तीव्रतेने वाटू लागले. परंतु केंद्र सरकार या बाबतीत हालचाल करण्यास तयार नाही हे लक्षात आल्यावर आपणच सत्याग्रह करून गोव्याच्या मुक्ती संग्रामास सहाय्य करावे, असे त्यांना मनोमन वाटू लागले. कारवार येथे भरलेल्या गोमंतक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी ही घोषणा केली आणि महाराष्ट्रात 'गोवा विमोचन सहाय्यक समितीच्या' स्थापनेत पुढाकार घेऊन ते या समितीचे सरचिटणीस झाले. पुढे १९५५ मध्ये ना. ग. गोरेंनी सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीचे नेतृत्व करण्याचा जो निर्णय घेतला तो त्यांच्या जीवनातील फार मोठा समरप्रसंग होता. पोर्तुगीज पोलिसांकडून झालेली जबर मारहाण त्यांनी धैर्याने सोसली.

१९५५ साली झालेल्या सामुदायिक सत्याग्रहाच्या वेळी झालेल्या गोळीबारात

अनेकजण मृत्यू पावल्याचे वृत्त ना. ग. गोरेंना समजले. त्यावेळी ते आग्वादच्या किल्ल्यात कारावासात होते. त्यावेळी हा सत्याग्रह पुढे चालवू नये असे त्यांना वाटले. सत्याग्रह योग्य असला तरी त्यापुढे सत्याग्रहींचे बलिदान होऊ नये, अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी आपले हे मनोगत स्पष्टपणे गोवा-विमोचन सहायक समितीच्या नेत्यांना कळवले. ना. ग. गोरेंच्या मते, गांधीजींनी सत्याग्रहाचा वापर ब्रिटिश सत्तेविरूध्द केला. यात त्यांचे मोठेपण होते. त्याचबरोबर ब्रिटीश सरकार न्यायबुध्दी आणि माणुसकी दाखवीत होते. हेही लक्षात ठेवले पाहिजे. पोर्तुगालचा पंतप्रधान सालाझार यांच्याविरूद्‌ध सत्याग्रह केल्यावर त्याने तो दंडुका व बंदुका वापरून चिरडून टाकण्याचे ठरविले.

१५ ऑगस्टच्या सत्याग्रहातील बलिदानानंतर यापुढे अधिक बलिदान करणे योग्य ठरणार नाही असे ना. ग. गोरेंना वाटले आणि म्हणून सत्याग्रह आंदोलन मागे घ्यावे असे त्यांचे मत त्यांनी गोवा विमोचन सहाय्यक समितीच्या नेत्यांना कळविले. असे मत तुरूंगातून व्यक्त करणे सत्याग्रही वृत्तीशी विसंगत आहे असे त्यांच्या बरोबरच्या नेत्यांना वाटत होते. परंतु सत्याग्रह सुरू करण्यात ना. ग. गोरेंनी पुढाकार घेतला असल्यामुळे त्यांनी त्यांचे मत विमोचन समितीला कळविणे ही त्यांची जबाबदारी आहे हे मान्य केले. पुढे -ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या मध्यस्थीमुळे अन्य नेत्यांबरोबर ना. ग. गोरेंची काही महिन्यांनी तुरूंगातून सुटका झाली. २३

गोवा स्वतंत्र करण्यासाठी भारतीय जनतेने केलेल्या आंदोलनाचा १५ ऑगस्ट १९५५ हा सर्वोच्चय बिंदू होता. जनआंदोलन सतत एकाच तीव्रतेने चालू शकत नाही गोव्यातही तेच घडले. काही काळाने आंदोलनाची तीव्रता कमी झाली. पोर्तुगीजांना वाटले की, आंदोलन संपले, याचाच अर्थ त्यांच्या सत्तेला भारतीय जनतेने दिलेले

आव्हानही संपुष्टात आले. १९५७ पासून हळूहळू राजबंदींना सोडण्यात आले. ना. ग. गोरे, शिरूभाऊ लिमये, मधू लिमये, त्रिदीब चौधरी आदी नेत्यांची मुक्तता करण्यात आली भारतीयांच्या या दिव्य त्यागामुळे गोव्यातील जनतेच्या मनातील स्वातंत्र्याकांक्षेची ज्योत तेवतच राहिली. त्या जनतेला आपले स्वप्न कधी साकार होणार? पारतंत्र्याच्या या बेडया केव्हा तुटणार ? असे वाटत होते. आणि अखेर या तपश्चर्येला फळ आले. भारत सरकारने १९६१ साली गोव्याच्या जनतेला मुक्त करण्याचा निर्णय घेतला. भारतीय सेना १८ डिसेंबर १९६१ रोजी गोव्यात घुसल्या पोर्तुगीज लष्कराने कोठे कोठे पूल उडवून दिले. कोठे प्रतिकाराचा दुबळा प्रयत्न ही केला पण भारतीय लष्करासमोर त्यांना उभेही राहता येईना. अखेर पोर्तुगीज सत्ता गोव्यातून नष्ट झाली. गोवा-दमन-दीव येथील जनता स्वंतत्र झाली. गोमंतकाच्या भूमीवर तिरंगा ध्वज फडकू लागला. २४

**क) कामगार चळवळ :**

स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये भाग घेतल्याने एक स्वातंत्र्य सैनिक म्हणून ही ना. ग. गोरेंना ओळखले जाते. देश स्वतंत्र करण्यासाठी देशात जी चळवळ झाली त्यात ते सहभागी झाले. गांधीजींच्या विचारानुसार त्यांनी स्वातंत्र्य लढ्यास वाहून घेतले. गांधीजींच्या मते, स्वराज्य मिळविण्यासाठी सर्व स्तरातील लोकांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेतले पाहिजे. त्यासाठी त्यांना संघटित केले पाहिजे. त्यांचे प्रश्न सोडविले पाहिजेत. हे गांधीजींचे विचार ना. ग. गोरे व त्यांच्या सहकाऱ्यांना पटले. त्यानुसार शेतकरी, कामगार, महिला, विद्यार्थी यांना संघटीत करण्यात आले. गांधीजींच्या विचाराप्रमाणे स्वातंत्र्याची चळवळ भक्कम करण्यासाठी शेतकरी, कानगार व तरूणांना संघटित केले पाहिजे म्हणून कामगारांच्या संघटना

बांधण्याचे काम सुरू झाले. सर्व कार्यकर्ते वेगवेगळ्या क्षेत्रात कामाला लागले.

ना. ग. गोरेंनी कामगारांना संघटित करण्याचे कार्य केले. कापड गिरणी कामगार, साखर कामगार, एस. टी. कामगार इ. कामगारांना संघटित करण्यासाठी कार्यकर्त्यांना पाठवले. या कार्यकर्त्यांना कामगार चळवळीत काम कसे करावे. कामगारांचे प्रबोधन कसे करावे या विषयी ना. ग. गोरे व एस. एम. जोशी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी कार्यकत्यांचे शिबीरात प्रशिक्षण घेतले. त्यांच्या प्रशिक्षणासाठी शिबीरात त्यंना वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांची बौध्दिके घेतली. त्यांचे खास लक्ष साखर कामगारांवर होते. त्यावेळी महाराष्ट्रात नऊ-दहा साखर कारखाने होते. त्यापैकी अहमदनगर जिल्ह्यात सहा कारखाने होते. त्यावेळी तेथे ब्रिटीश कंपनी होती. त्यांच्याकडून तेथील साखर कामगारांवर अन्याय होत होता. तेंव्हा तेथील स्थानिक कार्यकर्त्यांनी संप घडवून आणला. त्यांना ब्रिटीश सरकारने पकडले. परंतु कामगारांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी लढा चालू ठेवला.

तरूणांना संघटित करण्यासाठी एस. एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्र सेवा दलाची संघटना सुरू झाली. राष्ट्रसेवा दलामध्ये ना. ग. गोरे ही काम करत होते. राष्ट्र सेवा दलाच्या शाखा सर्व कारखान्यांवर व कारखान्यांच्या ऊस मळयांच्या वाडयावाडयांवर सुरू झाल्या. त्यामुळे वरचेवर कॉंग्रेस नेत्यांचे मार्गदर्शन व राष्ट्रसेवा दलाच्या कार्यकर्त्यांची बौध्दिके कामगारांना ऐकायला मिळू लागली. अशामुळे साखर कामगार जागृत झाला आणि आपल्या पगारादी मागण्यांबरोबरच देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सुरू झालेल्या चळवळीत सामील होऊ लागला. साखर कारखानदार कामगारांची पिळवणूक करत होते. बाई - कामगाराला पाच आणे आणि पुरूष कामगाराला आठ आणे रोजंदारी देऊन काम करून घेत होते. या

पिळवणुकीच्या विरोधात अगोदर रावसाहेब पटवर्धन, सारंगधर पवार यांच्या नेतृत्वाखाली ब्रॅडी कंपनीच्या बेलापूर साखर कारखान्याविरूद्ध ५० दिवसांचा संप करण्यात आला. त्यानंतर गंगाधर ओगले यांच्या नेतृत्वाखाली डहाणुकरांच्या महाराष्ट्र शुगर मिल्सविरूद्ध ५५ दिवसांचा लढा करण्यात आला. त्या लढयात गंगाधर ओगले यांच्यासह शेकडो कामगारांना पुण्याच्या येरवडा तुरूंगात डांबण्यात आले होते. त्यानंतर १९४४ मध्ये तेथील कामगारांना आपुलकी वाटावी म्हणून या लढयाचे नेतृत्व करण्यासाठी ना. ग. गोरे हे स्वतः धावून आले. त्यांनी तेथे सत्याग्रह केला त्यांना व त्यांच्याबरोबर शेकडो कामगारांना अटक करून त्यांचीही येरवडा तुरूंगात रवानगी करण्यात आली. ना. ग. गोरेंनी कामगारांना तुरूंगातही मार्गदर्शन केले. कामगारांचे पगार वाढ, बोनस तर त्यांना मिळाले पाहिजेत. परंतु त्याचबरोबर त्यांच्यात सामाजिक सुधारणा होण्यासाठी ना. ग. गोरेंनी तुरूंगात असताना त्यांची बौध्दिके घेतली. जुन्या रूढी, प्रथा, जातीभेद कमी होण्यासाठी तसेच अंधश्रध्दा नष्ट होण्यासाठी ना. ग. गोरेंनी त्यांची बौध्दिके घेतली. कामगारांमध्ये सामाजिक सुधारणा व्हाव्यात, अन्यायाला ते बळी पडू नयेत म्हणून ना. ग. गोरेंनी प्रयत्न केले. ज्या ज्या ठिकाणी कार्यकर्ते कामगार चळवळीचे काम करीत होते. तेथे जाऊन ना. ग. गोरे त्यांना मार्गदर्शन करत होते.

ना. ग. गोरेंच्या मते संघटित कामगार हा आर्थिकदृष्टया सर्वसामान्य माणसापेक्षा जरी कितीतरी अधिक समर्थ असला तरी अंधश्रद्धा, जातिप्रथा इ. बाबतीत तो त्याच्या मागासलेल्या बंधू-भगिनींहून वेगळा नाही. टिळकनगरच्या डहाणूकरांच्या साखर कारखान्यावर संप केल्याबद्दल ना. ग. गोरेंसह अनेक जणांना विसापूरच्या तुरूंगात ठेवले होते. तेथे रोज संध्याकाळी सर्वजण अभ्यासवर्गात बसत

असत. ना. ग. गोरे अनेक विषयांवर कामगार सत्याग्रहींना माहिती देत असत. ना. ग. गोरेंच्या मते खऱ्या समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादक वर्गाच्या हातीच कारखान्याचे व्यवस्थापन आले पाहिजे. प्रत्यक्ष कसणाऱ्याच्या हाती जमीन आली पाहिजे, यामध्ये जो न्याय तोच कारखान्यांच्या बाबतीत हवा. हे ध्येय जर कामगारांना गाठायचे असेल तर त्यांनी व्यवस्थापनविद्येचे यंत्रतंत्रविविद्येचे शिक्षण घेण्याची तयारी ठेवायला पाहिजे. तरूण कामगारांनी आपापल्या क्षेत्रातील वरच्या पायरीवरचे शिक्षण घेण्याची उमेद बाळगली पाहिजे. त्या करिता शासनाने नाही तर मालकाने आणि तेही शक्य नसेल तर आपण कामगारांनी स्वत:च अशा तऱ्हेचे शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन करण्याचा उपक्रम केला पाहिजे.

ना. ग. गोरे हे कोपरगावच्या साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष होते. मुंबई औद्योगिक संबंध कायदा झाल्यानंतर एकाच तालुक्यात एका धंदयामध्ये वेगवेगळया युनियनना मान्यता मिळणार नाही, असे बंधन आले. त्यामुळे कोपरगाव तालुक्यातील साखरधंदयामधील तीन संघटनांच्या एकीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन १९५० मध्ये कोपरगाव तालुक्यातील एकजूटीच्या 'कोपरगाव तालुका साखर कामगार सभेस' रितसर मान्यता मिळाली. या अध्यक्षपदाची धुरा नंतर ना. ग. गोरे यांनी वाहिली आणि किशोर पवार यांनी सरचिटणीस पदाची जबाबदारी स्वीकारली. कोपरगाव तालुका साखर कामगारांना राष्ट्रीय स्तरावरील समाजवादी नेते ना. ग. गोरे यांचे नेतृत्व लाभले. सुमारे ३५ वर्षाहून अधिक काळ थोर समाजवादी विचावंत ना. ग. गोरे यांनी या संघटनेचे अध्यक्षपद भूषविले.

ना. ग. गोरेंच्या मते, आपल्या देशातील बडे भांडवलदार कोणाही एखाद्या हुशार यंत्रज्ञाला किंवा व्यवस्थापकाला कामगार घेतात आणि त्याच्या लायकीपेक्षा

दीडपट-दुप्पट पगार त्याला देतात. मग तो मालकाचा पूर्णपणे मिंधा बनतो. आणि वर डोके करून पाहण्याची त्याची हिंमत होत नाही. भारतामधील संघटित कामगार वर्गाची काहीशी तशीच स्थिती झालेली आहे. मानवाच्या जीवनासाठी लागणाऱ्या वस्तू अमाप प्रमाणात उत्पन्न करू शकणारे यंत्रयुग आल्यावर केवळ मूठभर लोकांच्या गरजा नव्हेत तर समस्त समाजाची गरज लक्षात घेऊन उत्पादन करण्याची शक्ती प्रथमच निर्माण झाली. पण त्याचबरोबर अशी व्यापक सामाजिक दृष्टी मान्य करणारी समाजरचना निर्माण करणे ही क्रमप्राप्त झाले. हा नवसमाज निर्माण करण्याच्या प्रयत्नात रात्रंदिवस ज्यांचा यंत्राशी संबंध येतो. त्या कामगाराने महत्वाचा वाटा उचलने गरजेचे आहे.

ना. ग. गोरेंच्या मते, यंत्रयुगामध्येही अथवा विज्ञानयुगानध्ये शोषणरहित समाज निर्माण करण्याच्या उद्दिष्टांच्या दोन बाजू आहेत. एक यंत्रविज्ञानाचा सर्वांगीण परिचय कामगारांनी करून घेणे आणि दुसरी, यंत्रातून होणारे उत्पादन केवळ आपल्या उपभोगामध्ये वाढ होत राहण्यासाठीच नसून, सगळया समाजाला त्याचा उपयोग झाला पाहिजे, ही जाणीव स्वत:च्या जीवनात आणि समाज जीवनात जोपासणे. गोरेंच्या मते, यंत्रयुगीन सामाजिक क्रांतीचा अग्रदूत कामगार वर्ग होईल ही मार्क्सची अपेक्षा फोल ठरत गेली. याचे कारण हेच, की कामगारवर्गाच्या जाणीवा, चळवळी आणि संघटना स्वत:च्या वर्गापुरत्या मर्यादित झाल्या त्या सर्व समाजाशी एकरूप होऊ शकल्या नाहीत. यासाठी कामगार वर्गाने स्वहिताबरोबरच समाज हिताचा पाठपुरावा केला पाहिजे. २५

कामगारांची वैचारिक भूमिका खंबीर व्हावी यासाठी त्यांची बौध्दिक घेत असतानाच ना. ग. गोरे त्यांना सांगत की, आपल्या विचारांप्रमाणेच आपण वागले

पाहिजे. मुंबईला गिरणी कामगार तरूणांचा एक गट होता. नायगाव भागात राहणारे हे सर्व तरूण रत्नागिरी जिल्हयातून आलेले होते. ना. ग. गोरेंचे एक भाषण ऐकल्यानंतर हे तरूण त्यांना म्हणाले, ''तुम्ही आम्हाला कार्यक्रम दया''. त्यावर ना. ग. गोरे म्हणाले, ''तुम्ही प्रत्येकी दहा रूपये देऊन तुमच्यापुरते सहकारी तत्त्वार रेशनचे दुकान सुरू करा. सहकारी चळवळ हा समाजवादी चळवळीचा महत्वाचा पैलू आहे. हे स्वस्त धान्याचे दुकान तुम्ही चोखपणे चालवा पुढचे पाऊल काय टाकायचे तो मार्ग तुम्हाला सापडेल''. ना. ग. गोरेंच्या सांगण्याप्रमाणे त्या तरूणांनी प्रथम रेशनच्या धान्याचे नंतर किराणा मालाचे सहकारी दुकान अशी वाटचाल सुरू केली. त्यातूनच या कार्यकर्त्यांनी 'मुंबई कामगार ग्राहक सहकारी मंडळ' ही संस्था स्थापन केली. त्यातून 'अपना बझार' हे डिपार्टमेंटल स्टोअर उभे राहिले. अशा प्रकारे ना. ग. गोरेंच्या मार्गदर्शनामुळे या तरूणांची वाटचाल सुकर झाली.२६

ना. ग. गोरे यांनी प्रेस कामगार, साखर कामगार यांच्या संघटना उभारून त्यांचे आार्थिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. कामगारांचे त्यांनी समाजवादी वाटचालीतून प्रबोधन केले. आर्थिक विषमता कमी करून कामगारांना त्यांचा न्याय्य वाटा मिळावा यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात तसेच स्वातंत्र्योत्तर काळात प्रयत्न केले. कामगारांमध्ये समाजाच्या हिताची जाणीव निर्माण करण्याचे काम ते सतत करत होते.

ना. ग. गोरे हे बुध्दिप्रामाण्यवादी होते. त्यामुळे त्यांनी त्यांच्या जीवनात मनाला जे पटेल तेच केले. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्रयत्न केले. तसेच आयुष्यभर समाजवादी विचारांचा पाठपुरावा केला. अन्यायाविरूद्ध लढे उभारले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती चळवळ, कामगार चळवळ या चळवळीमध्ये हिरीरीने

भाग घेतला. या चळवळी यशस्वी करून दाखविल्या. आपल्या जीवनातील मूल्ये त्यांनी जपण्याचा प्रयत्न केला. समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्षांमार्फत त्यांनी जनतेच्या हिताचा विचार केला. संघर्ष, रचना, प्रबोधन, शिस्त व जीवनमूल्यांची पक्की बैठक स्वीकारून जीवन व समाजजीवन सुंदर घडविण्याचा प्रयत्न ना. ग. गोरे यांनी अखेरच्या क्षणापर्यंत केला. अशा प्रकारे ना. ग. गोरेंनी या तिन्ही चळवळीत भाग घेऊन त्या यशस्वी करून दाखविल्या.

# संदर्भसूची


१. जोशी एस. एम. - 'मी अेस अेम' आत्मकथा कॉन्टिनेन्टल प्रकाशन पृ.क्र. १८७

२. फडके य. दि. - 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' खंड ५ श्री विद्या प्रकाशन २५० शनिवार पेठ, पुणे प्रथमावृत्ती १५ एप्रिल १९९७ पृ. क्र. ३५४, ३५५, ३५६, ३५७

३. जोशी एस. एम. - 'मी अेस अेम' आत्मकथा कॉन्टिनेन्टल प्रकाशन पृ. क्र. १८७, १८८, १८९, १९०, १९१, १९२

४. कित्ता - पृ. क्र. १९४

५. फडके य. दि. - 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' खंड आठवा मौज प्रकाशन, पहिली आवृत्ती १८ जून २००७ पृ. क्र. १३, १४

६. कित्ता पृ. क्र. १, २

७. कित्ता पृ. क्र. १३

८ फडके य. दि. - 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' खंड आठवा मौज प्रकाशन पहिली आवृत्ती १८ जून २००७ पृ. क्र. ३३९

९. दंडवते मधू - 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल' गोरे गौरव संपा- सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन मुंबई पृ. क्र. २१, २२

१०. जोशी एस. एम. - 'परममित्र' गोरे गौरव संपा-सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन मुंबई पृ. क्र. ४

११. पोतदार काशीनाथ - 'सरस्वतीपुत्र' गोरे गौरव संपा - सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई पृ. क्र. ८७, ८९,९२

१२. प्रधान ग. प्र. - 'नानासाहेब गोरे-एक समर्पित जीवन' साधना ना. ग. गोरे प्रथम स्मृतिदिन अंक १ मे १९९४ प्रकाशन-साधना प्रेस, पुणे पृ. क्र. ८

१३. फडके य. दि. - 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' खंड आठवा मौज प्रकाशन, पहिली आवृत्ती १८ जून २००७ पृ. क्र. २४२, ३०४ पृ. क्र. १८७, १८८, १८९, १९०, १९१, १९२

१४. कित्ता - पृ. क्र. ३३९, ३४२, ३४४, ३४५

१५. प्रधान ग. प्र. - 'स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत' प्रकाशन -साधना प्रेस, पुणे पृ. क्र. ४२६, ४२७, ४३०

१६. फडके य. दि. - 'विसाव्याशतकातील महाराष्ट्र' खंड ५ श्रीविदया प्रकाशन, प्रथमवृत्ती १५ एप्रिल १९९७ पृ. क्र. ३७७, ३८१, ३९५

१७. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे' प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, पृ. क्र. ५०, ५१

१८. प्रधान ग. प्र. - 'स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत' प्रकाशन- साधना प्रेस, पुणे पृ. क्र. ४३०, ४३१, ४३२

१९. प्रधान ग. प्र. - ‘महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, पृ. क्र. ५१

२०. प्रधान ग. प्र. - ‘स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत’ प्रकाशन - साधना प्रेस, पुणे पृ. क्र. ४३२, ४३३, ४३४

२१. प्रधान ग. प्र. - ‘महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे’ प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई पृ. क्र. ५२

२२. मठकर जयानंद - ‘नानासाहेबांच्या सहवासात’ गोरे गौरव संपादक - सदानंद वर्दे प्रकाशन श्री. पु. भागवत मौज प्रकाशन मुंबई पृ. क्र. ९६, ३७

२३. प्रधान ग. प्र .- ‘नानासाहेब गोरे एक समर्पित जीवन’ ना. ग. गोरे प्रथम स्मृतीदिन अंक १ मे १९९४ प्रकाशन - साधना प्रेस पृ. क्र. ७, ८

२४. प्रधान ग. प्र. - ‘स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत’ प्रकाशन - साधना प्रेस, पुणे पृ. क्र. ४३५

२५. गोरे ना. ग. - ‘कामगार बंधुशी हितगुज’ साथी किशोर पवार गौरव ग्रंथ साधना प्रेस २४ जून २००६ पृ. क्र. ३३, ३४, ३५, ३६

२६. प्रधान ग. प्र. - ‘महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे’ प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृ. क्र. ४९